# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ६/२/२०२४ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५३५**
**दिनांक – ६/२/२०२४**

**विषय क्रमांक- ५३५**
**खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५३५ दिनांक - ६/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/३९/२०२४ दि.१८/०१/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२९३५ दि.३०/१/२०२४ अन्वये, मनपाचे स्वामी विवेकानंद क्रीडा संकुल, कृष्णानगर येथील २ लॉनटेनिस हार्ड कोर्ट महाराष्ट्र लॉनटेनिस असोसिएशन या संस्थेला चालविणेस देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५३५ दिनांक - ६/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/३९/२०२४ दि.१८/०१/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२९३५ दि.३०/१/२०२४ अन्वये, सेक्रेटरी, महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांनी दि.२८/०४/२०२३ चे पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्वामी विवेकानंद क्रीडा संकुल, कृष्णानगर येथील २ लॉनटेनिस कोर्ट संघटने मार्फत चालविण्याची परवानगी मागतली आहे. सदर संस्थेमार्फत चालविण्यास घेतल्यानंतर त्यांचे कडून खालीलप्रमाणे जबाबदारी / कार्य केली जाणार आहे असे कळविले आहे.<br>१) २ मैदानाचे स्वच्छता व साफसफाई करण्यात येईल.<br>२) २ केंद्रावर एकूण प्रशिक्षणार्थी संखेच्या ६० टक्के (ज्यामध्ये खाजगी शाळेतील विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, क्रीडापटू, खाजगी कोचिंगसाठी नाव नोंदणी करणारी इतर कोणतीही व्यक्ती समाविष्ट असेल) त्यांना प्रशिक्षण देणेची मुभा राहील व एकूण प्रशिक्षणार्थी संख्येच्या ४० टक्के मुले म.न.पा. शाळेतील संबंधित क्रीडा शिक्षक यांचेशी समन्वय साधून तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवड करून देतील त्याचा समावेश असेल.<br>३) टेनिस खेळाडूंसाठी सहयोगी सेवा केंद्र स्थापन करणे आहेत त्यामध्ये खेळाडूंना पोषण, मानसिक कणखरता, दुखापती व्यवस्थापन, पुनर्वसन यासारख्या सेवांचा समावेश असेल.<br>४) लॉन टेनिस खेळाला चालना देण्यासाठी खेळाडूंसाठी स्पर्धा आणि प्रशिक्षकांचे |

| | |
|---|---|
| | प्रशिक्षण कार्यक्रम, उन्हाळी शिबिरे इत्यादीसारख्या उपक्रमांचे आयोजन करणे.<br>५) २ ठिकाणांपैकी एका केंद्रावर जर PCMC ने Centre of Allied services तयार करून दिले तर तेथे MSLTA चे मुख्यालय देखील बनेल, जेथे PCMC क्षेत्रातील प्रतिभावान आणि निवडलेल्या मुलांना सर्व संबंधित सेवांसह अत्याधुनिक प्रशिक्षण मिळेल.<br>पिंपरी चिंचवड म.न.पा परिसरात राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय दर्जाचे लॉन टेनिस खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या वतीने खाजगी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे लॉन टेनिस प्रशिक्षक त्यांची संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड लॉन टेनिस प्रशिक्षण केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने म.न.पा चे स्वामी विवेकानंद क्रीडा संकुल,कृष्णानगर विहित अटी व शर्तीनुसार २ वर्षे कराराने चालविण्यास देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५३६** **विषय क्रमांक- ५३६**
**दिनांक – ६/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५३६ दिनांक - ६/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/४२/२०२४ दि.२९/०१/२०२४ मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२९५५ दि.३०/१/२०२४ अन्वये, असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स (ATP)/ वुमेन्स टेनिस असोसिएशन (WTP) स्पर्धेचे आयोजनाकरीता अनुदान देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५३६ दिनांक - ६/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/४२/२०२४ दि.२९/०१/२०२४ मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२९५५ दि.३०/१/२०२४ अन्वये, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.क्रीस्पर्धा3223/प्र.क्र.58/क्रीयुसे-2 दि.05 जून 2023 अन्वये असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स (ATP)/ वुमेन्स टेनिस असोसिएशन (WTP) स्पर्धेचे आयोजन शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर स्पर्धेकरीता समिती गठीत करण्यात आलेली असून सदर आयोजन समितीची कार्यकक्षातील मुद्या क्र. २ नुसार, " स्पर्धेच्या आयोजनासाठी बक्षीसांची रक्कम MMRDA यांनी द्यावी व |

| | |
|---|---|
| | उर्वरित निधीची उभारणी करणेसाठी प्रमुख शासकीय/निम शासकीय संस्थाव्दारे निधी उभारावा. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सिडको, एमआयडीसी, एमटीडीसी, एमएसईडीईएल पॉवर जनरेटर, डिपार्टमेंट ऑप इंडस्ट्रीज, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका याशिवाय इतर शासकीय विभाग, प्रमुख बँका व अन्य खाजगी कंपनीकडुन सीएसआर व अन्य देणगी स्वरुपात निधी उभारण्यासाठी संपर्क करावा." असे नमुद आहे. डॉ.सुहास दिवसे, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांचे दि. 03 ऑक्टोंबर २०२३ रोजीच्या पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स (ATP)/ वुमेन्स टेनिस असोसिएशन (WTP) स्पर्धासाठी दरवर्षी र.रु. १ कोटी प्रमाणे पुढील पाच वर्षे आर्थिक सहकार्य करुन असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स (ATP) / वुमेन्स टेनिस असोसिएशन (WTP) स्पर्धेचे प्रायोजकत्व स्विकारावे अशी विनंती केलेली आहे. तसेच मा.श्री.ओम प्रकाश गुप्ता, अपर मुख्य सचिव यांचे दि.12 ऑक्टोबर २०२३ रोजीच्या पत्रानुसार, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांचेकडील मागणीचे अनुषंगाने आवश्यक सहकार्य व कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. सबब असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स (ATP)/ वुमेन्स टेनिस असोसिएशन (WTP) स्पर्धेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पुढील 5 वर्षांकरीता प्रतिवर्षी 1 कोटी या प्रमाणे एकुण ५ कोटी अनुदान देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५३७**
**दिनांक – ६/२/२०२४**

**विषय क्रमांक- ५३७**
**खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५३७ दिनांक - ६/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.वैद्य/१४अ/कावि/८५/२०२४ दि.३१/०१/२०२४ अन्वये, वैद्यकीय विम्याकरीता तरतुद वर्गीकरण करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५३७ दिनांक - ६/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.वैद्य/१४अ/कावि/८५/२०२४ दि.३१/०१/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त् अधिकारी/ कर्मचा-यांकरीता दि.01/09/2015 पासून धन्वंतरी स्वास्थ्य योजना सुरु करणेत आलेली आहे. तसेच धन्वंतरी स्वास्थ्य योजने ऐवजी वैद्यकीय विमा लागू करणेचे |

<table>
<tr><td></td><td>प्रयोजन आहे व त्याकामी सन 2023-2024 चे सुधारित अंदाजपत्रकामध्ये वैद्यकीय विमा या लेखाशिर्षावर र.रु. 28,00,00,000/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे.<br>तरी वैद्यकीय विमा लागू करणेबाबत कार्यवाही सुरु असून जर सुधारित कामकाज आदेश त्वरीत द्यावयाचा झालेस सदर वैद्यकीय विमा या लेखाशिर्षावर र.रु. 28,00,00,000/- इतकी रक्कम विमा हप्ता अदायगीकामी गरजेचे आहे. तरी वैद्यकीय विम्यासाठी र.रु. 28,00,00,000/- पिंपरी चिंचवड मनपाचे भुमी संपादन निधी कडून वैद्यकीय विमा निधीकडे तरतुद वर्गीकरण करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे –<br><table><tr><th>अ.क्र.</th><th>विभागाचे नाव</th><th>निधीचे नाव</th><th>सन 2023-2024 मुळ तरतुद</th><th>वाढ</th><th>घट</th></tr><tr><td>1</td><td>धन्वंतरी विभाग</td><td>वैद्यकीय विमा</td><td>1,000</td><td>28 कोटी</td><td>0</td></tr><tr><td>2</td><td>नगररचना व विकास विभाग</td><td>भुमी संपादन निधी</td><td>120,00,00,000</td><td>0</td><td>28 कोटी</td></tr></table><br>वरील प्रमाणे नमुद केलेप्रमाणे तातडीने वर्गीकरण करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय:</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५३८**
**दिनांक – ६/२/२०२४**

**विषय क्रमांक- ५३८**
**खाते-मा.आयुक्त**

<table>
<tr><td>विषय क्र. ५३८<br>दिनांक -<br>६/२/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.अक्षेका/वि/कावि/चिं-२/२८९/२०२४ दि.३१/०१/२०२४ अन्वये, सन २०२४ मधील महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरूपात ध्वनीक्षेपण, प्रकाश व्यवस्था व CCTV व्यवस्था करणे, तसेच जनरेटर द्वारे वीजपुरवठा करणे या कामाचे नांव सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन प्रशासकिय मान्यता देणे बाबत...</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ५३८<br>दिनांक -<br>६/२/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.अक्षेका/वि/कावि/चिं-२/२८९/२०२४ दि.३१/०१/२०२४ अन्वये, विषयांकीत कामाचे र.रू. २४,९९,९३९/- इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार केले असून, अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत मनपा तर्फे होणारे कामांतर्गत महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संयुक्त जयंती महोत्सव निमित्त होणाऱ्या कार्यक्रमांकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या मागे, महात्मा ज्योतिबा</td></tr>
</table>

<table>
<tr><td></td><td>फुले स्मारक, सावित्रिबाई फुले स्मारक व अन्य ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांकरिता तात्पुरत्या स्वरूपात प्रकाश व्यवस्था व ध्वनिक्षेपन व्यवस्था, CCTV यंत्रणा तसेच जनरेटर द्वारे वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रम हे माहे एप्रिल २०२४ मध्ये होणार असलेने सदर कामाचा खर्च सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात होणार आहे. तथापी पुढील काळात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू होणार असल्याने तत्पुर्वी निविदा प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाचे नांव सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात समाविष्ट करून र.रू. २५,००,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मा. महापालिका सभेची प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे.
<table>
<tr><th>अनु.क्र.</th><th>कामाचे नाव</th><th>लेखाशीर्ष</th><th>अंदाजपत्रकीय रक्कम</th></tr>
<tr><td>१</td><td>सन २०२४ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव व होणाऱ्या निवडणूक कार्यक्रमाकरिता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण, प्रकाश व्यवस्था, CCTV व्यवस्था करणे, तसेच जनरेटर द्वारे वीजपुरवठा करणे.</td><td>सार्वजनिक सुरक्षितता विद्युत मुख्य</td><td>२५०००००/-</td></tr>
</table>
उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद कामाचा विद्युत विभागाचे सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेस तसेच तक्त्यात नमूद कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय:</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५३९** **विषय क्रमांक- ५३९**
**दिनांक – ६/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

<table>
<tr><td>विषय क्र. ५३९<br>दिनांक -<br>६/२/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.अक्षेका/वि/कावि/चिं-२/२९०/२०२४ दि.३१/०१/२०२४ अन्वये, सन २०२४ मध्ये होणाऱ्या निवडणुक कार्यक्रमा करीता आवश्यक्तेनुसार तात्परत्या स्वरूपात ध्वनीक्षेपण, प्रकाश, व जनरेटर द्वारे विजुरवठा करणे. ह्या कामाचे नांव सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन प्रशासकिय मान्यता देणे बाबत...</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ५३९<br>दिनांक -<br>६/२/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.अक्षेका/वि/कावि/चिं-२/२९०/२०२४ दि.३१/०१/२०२४ अन्वये, विषयांकीत कामाचे र.रू. ५२,७३,६८२/- इतक्या खर्चाचे</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | अंदाजपत्रक तयार केले असून, अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सन २०२४ मध्ये होणाऱ्या निवडणुक कार्यक्रमा करीता विविध ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात प्रकाश व्यवस्था व ध्वनिक्षेपन व्यवस्था, CCTV यंत्रणा तसेच जनरेटर द्वारे वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रम हे माहे एप्रिल २०२४ मध्ये होणार असलेने याचा खर्च सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात होणार आहे. सदर कामाचे नांव सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात समाविष्ट करून त्यास मा. महापालिका सभेची प्रशासकिय मान्यता मिळणे आवश्यक आहे. तथापी पुढील काळात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू होणार आहे तत्पुर्वी निविदा प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. तसेच या कामाचे "सन २०२४ मध्ये होणाऱ्या निवडणुक कार्यक्रमा करीता उपरोक्त कामाचे सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात समाविष्ट करून र.रू. ६०,००,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मा. महापालिका सभेची प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे. |

| अनु.क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सन २०२४ मध्ये होणाऱ्या निवडणुक कार्यक्रमा करीता आवश्यक्तेनुसार तात्पुरत्या स्वरूपात ध्वनीक्षेपण, प्रकाश व्यवस्था, व जनरेटर द्वारे विजपुरवठा करणे. | सार्वजनिक सुरक्षितता विद्युत मुख्य | ६००००००/- |

| | |
|---|---|
| | उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद कामाचा विद्युत विभागाचे सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेस तसेच तक्त्यात नमूद कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५४०** **विषय क्रमांक- ५४०**
**दिनांक – ६/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५४० दिनांक - ६/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. विमुका/५/कावि/५२/२०२४ दिनांक ०६/०२/२०२४ अन्वये, मनपाचे ब' क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नवीन तालेरा हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन थिएटर करिता विद्युत विषयक तसेच मेडीकल गॅस पाईप लाईन व इतर अनुषंगिक कामे करणे या कामाचे सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५४० दिनांक - ६/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. विमुका/५/कावि/५२/२०२४ दिनांक ०६/०२/२०२४ अन्वये, मनपाचे ब' क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नवीन तालेरा हॉस्पिटल मध्ये ऑपरेशन थिएटर करिता विद्युत विषयक तसेच मेडीकल गॅस पाईप लाईन व इतर अनुषंगिक कामे वैद्यकीय व विद्युत विभागामार्फत एकत्रितरीत्या करण्यात येणार असून विद्युत विभागामार्फत निविदा काढणेत येणार आहे. सदर ठिकाणी स्थापत्य विभागाचे काम चालू |

| | |
|---|---|
| | आहे. तथापि सदर कामाचा अंदाजपत्रकात समावेश नसल्याने सदर काम विद्युत विभागांतर्गत रुग्णालय व प्रसूतिगृह लेखाशिर्षावर सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेस खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

**ब प्रभाग मुख्यालय अंदाजपत्रकात नाव समावेश करणे**

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|
| १ | ब' क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नवीन तालेरा हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन थिएटर करिता विद्युत विषयक तसेच मेडीकल गॅस पाईप लाईन व इतर अनुषंगिक कामे करणे (सल्लागार फी सह). | रुग्णालये/प्रसूतिगृहे/औषधालये | १३ कोटी |

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**